**<u>(आरोपीला जेलमधुन व्ही.सीद्वारे दुपारी१२.०१ वाजता हजर करण्यात आले. पुरावा चालु असतांना व्ही.सी. सुरू आहे.)</u>**

**<u>नि.क्र.४९ च्या आदेशाच्या अनुषंगाने फिर्यादी नाना उर्फ नानासाहेब माधव नेटके यांचा पुढील उलटतपास विधीज्ञ श्री. ए.एम. काळे यांचे मार्फत शपथेवर सुरु</u>** –

१३. मी ऑफीस सुप्रींटेंडेंट म्हणुन बी.एस.एन.एल. मधुन निवृत्त झालो. माझे शिक्षण एस.एस.सी.१०वी पासपर्यंत झालेले आहे.

प्रश्न – तुम्ही पैसे भाग्यलक्ष्मी मल्टीस्टेट क्रेडीट को ऑप सोसायटी यांना दिले?
उत्तर – मी भारत बबन पुंड चेअरमन,भाग्यलक्ष्मी मल्टीस्टेट क्रेडीट को ऑप सोसायटी यांच्या ताब्यात पैसे दिले.

१४. हे म्हणणे खरे आहे की, हे पैसे मी भाग्यलक्ष्मी मल्टीस्टेट क्रेडीट को ऑप सोसायटी यांना एफ डी करायला दिले. हे म्हणणे खरे आहे की, चेकची केस पंधरा लाखांची केली. हे म्हणणे खरे नाही की, भाग्यलक्ष्मी मल्टीस्टेट क्रेडीट को ऑप सोसायटी कडे माझी पाच लाख रूपयांची एफ डी होती. माझे पत्नीचे नावे रक्कम रूपये ४,५०,०००/– एफ डी होती, मुलाचे नावे रक्कम रूपये २,१०,०००/– ची एफ डी होती, मुलीच्या नावाने रक्कम रूपये १,१०,०००/– ची एफ डी होती आणि माझे स्वत:च्या नावे रक्कम रूपये ६,११,०००/– रूपयांची एफ डी होती. मला सर्व एफ डी मिळुन सोसायटीकडुन १३,८१,०००/– रूपये येणे होते, पुंड साहेबांनी १,१९,०००/– व्याज देतो असे म्हणुन मला त्यांनी दोन चेक दिले.

१५. हे म्हणणे खरे आहे की, एकुण येणे पंधरा लाख रूपये बाकी होती म्हणुन मी पंधरा लाख रूपयांची केस केली. हे म्हणणे खरे नाही की, मी, माझी पत्नी, मुलगी आणि मुलगा यांच्यात या रक्कमेच्या वसुलीबाबत करार झालेला नाही. मला माझी मुलगी, मुलगा आणि पत्नी यांनी रक्कम वसुल करण्यासाठी

अधिकार दिल्याबाबत दस्त किंवा अधिकारपत्र प्रकरणात दाखल केलेले नाही. माझी पत्नी, मुलगी आणि मुलगा यांचे बँकेत खाते आहे. हे म्हणणे खरे आहे की, या तिघांचे आणि माझे आजरोजी अतिशय चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझी पत्नी, मुलगा आणि मुलगी हे आरोपीने चेक दिले त्यावेळी माझे सोबतच एकत्र कुटुंबात राहत होते. मला माझी पत्नी, मुलगी आणि मुलगा यांच्यावतीने मी आरोपीकडुन चेक घ्यावा याबाबत मी त्यादिवशी कोणताही दस्त नोंदवुन घेतलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यांनी मला अधिकार दिला असा कोणताही कागद आज माझेकडे नाही.

१६. हे म्हणणे खरे आहे की, मी भारत बबन पुंड यांना नोटीस पाठविली. हे म्हणणे खरे आहे की, नोटीस केवळ माझे वतीने पाठविली. हे म्हणणे खरे आहे की, मी भारत बबन पुंड यांच्याविरूध्द केस दाखल केली. हे म्हणणे खरे आहे की, नोटीस देतांना मी, माझी पत्नी व दोन मुलांना पार्टी केलेले नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, मी जबाबदार असल्याने त्यांना पार्टी केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, खटला दाखल करतांना व पुरावा देतांनासुध्दा त्यांना पार्टी केलेले नाही.

प्रश्न – तुम्ही भाग्यलक्ष्मी मल्टीस्टेट को ऑप सोसायटी यांना नोटीस पाठविली का ?

उत्तर – पुंड हे भाग्यलक्ष्मी सोसायटीचे चेअरमन आहेत.

भाग्यलक्ष्मी म्हणजेच पुंड आहेत आणि ते जबाबदार माणसं आहेत त्यामुळे मी पुंड यांनाच नोटीस पाठविली. हे म्हणणे खरे आहे की, मी भाग्यलक्ष्मी सोसायटीला या प्रकरणात पार्टी केलेले नाही.

प्रश्न – भाग्यलक्ष्मी सोसायटी विरूध्द तुम्ही पुरावा दिलेला नाही?

उत्तर – सोसायटीविरूध्द पुरावा देण्याची गरज नाही.

हे म्हणणे खरे आहे की, भाग्यलक्ष्मीची पुर्ण जबाबदारी पुंड यांनी घेतलेली आहे

असा कागद आजपर्यंत न्यायालयात दाखल केलेला नाही.

१७. हे म्हणणे खरे नाही की, माझेत आणि पुंड यांच्यात आजपर्यंत कोणताही लेखी करार झालेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, तसा करार मी नोटीस पाठविल्यापासुन मागच्या तारखेपर्यंत वकीलांना दिलेला नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की मला तो कागद कालच सापडला. हे म्हणणे खरे आहे की, या कागदाबाबत मी आज पहिल्यांदाच न्यायालयात सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी पत्नी, मुलगा व मुलगी आणि भारत पुंड यांच्यात कुठलाही लेखी करार झालेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, भाग्यलक्ष्मी सोसायटी आणि माझी पत्नी, मुलगा व मुलगी यांच्यात या रक्कमेबाबत लेखी करार झालेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी पत्नी, मुलगा व मुलगी आणि भारत पुंड यांच्यातील लेखी करार मी आजपर्यंत प्रकरणात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी पत्नी, मुलगा व मुलगी यांनी मला भारत पुंड यांच्याकडुन रक्कम वसुल करण्याकरीता मी माझी नोटीस, फिर्यादी आणि पुराव्याच्या शपथपत्रात नमुद केलेले नाही.

आरोपीच्या विधीज्ञांच्या तोंडी विनंतीवरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब. त्यानंतर दोन्ही पक्षांच्या संमतीने पुढील तारीख ०४/०४/२०२६ देण्यात आली. सदर उलटतपास १२.५४ वाजेपर्यंत आरोपीच्या उपस्थितीत व्ही.सी.द्वारे चालु होता.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

जबाब माझे समक्ष व उपस्थितीत नोंदवला.

सही/-

( माधुरी रा. खनवे )

दिनांक १२/०३/२०२६ अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,

कोर्ट नं.०४, अहमदनगर